# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वाढवण (जि.पालघर) बंदर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत

**(१) २८३ (०७-०४-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढवण (जि.पालघर) बंदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी अंदाजित रुपये ७६,२२० कोटी एवढा खर्च येण्याची शक्यता असून सदर प्रकल्पाच्या पहिला टप्प्याच्या मंजूरीसाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढवण बंदराच्या प्रस्तावास केंद्र शासनामार्फत लवकरात लवकर मंजूरी मिळावी याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (२७-१०-२०२५) :** (१) पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या उभारणीकरीता जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण यांचेकडून केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

(२) वाढवण येथे मोठे बंदर (Major Port) उभारण्याच्या प्रस्तावाला केंद्र शासनाने दिनांक १९/०६/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कामगारांना कायम करण्याबाबत

**(२) ५०० (०७-०४-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे गेल्या २० ते ४० वर्षांपासून काम करणाऱ्या OBC, ST, VJNT, SC तसेच खुल्या संवर्गातील कामगारांना “कायम” करण्याकरीता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्याकडून आलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन दापोली व परभणीच्या कृषी विद्यापीठाप्रमाणे कायम करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी संबंधित कामगारांना दिनांक २४ जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कायम करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (११-०९-२०२५) :** (१) व (२) कृषी व पदुम विभागाच्या दिनांक २४/०७/२०१५ शासन निर्णयाद्वारे राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रोजंदारी मजुर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम/नियमित करणेबाबत राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १६/११/२०१५ नुसार डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला मधील २५४ रोजंदारी मजुर व कुशल अर्धकुशल कर्मचाऱ्यांना विद्यापीठ सेवेत नियमित करण्यात आले आहे.

याखेरीज कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या दिनांक ०७/०७/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेला प्रस्ताव नियमोचित नसल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नवीन वाळू धोरण जाहीर करण्याबाबत

**(३) ८८५ (०७-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात वाळूमाफियांनी शासकीय अधिकाऱ्यांवर अनेकदा हल्ले तसेच मारहाण करुन वेळप्रसंगी त्यांची हत्या केल्यामुळे लिलाव पध्दत बंद करुन शासकीय डेपोमार्फत वाळू विक्री पध्दत रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दोन वर्षांपूर्वी घेतलेल्या निर्णयाऐवजी लिलाव व निविदाद्वारे वाळू कंत्राटदार नियुक्ती करण्यात येणार असल्याचे व त्यानुसार नवीन वाळू धोरण जाहीर करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन वाळू धोरण जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-०९-२०२५) :** (१) वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करुन देण्यास क्षेत्रियस्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपध्दती व लिलावपध्दती यामधील गुण-दोष विचारात घेता शासनामार्फत वाळू/ रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री धोरण, दिनांक १६/०२/२०२४ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने सुधारित वाळू धोरण निर्गमित होईपर्यंत सदर वाळू धोरणानुसार निविदा प्रक्रीया राबविण्यास दिनांक ०३/०१/२०२५ च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली होती.

(२) व (३) दिनांक ३०/०१/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ च्या अनुषंगाने हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन वाळू/रेती धोरण दिनांक ०८/०४/२०२५ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आले होते. मा.मंत्रिमंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन शासनामार्फत वाळू / रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचा दिनांक १६/०२/२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण - २०२५ निर्गमित केले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील शासकीय कृषी महाविद्यालयाचे संत मुक्ताई शासकीय कृषी महाविद्यालय असे नामकरण करणेबाबत

**(४) ९०४ (०७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्यात आले असून सदर महाविद्यालयाचे संत मुक्ताई शासकीय कृषी महाविद्यालय असे नामकरण करणेसंदर्भात दिनांक २७/०८/२०२३ रोजी विधानपरिषद सदस्य यांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (११-०९-२०२५) :** (१) होय.
(२) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव या महाविद्यालयाचे नामकरण संत मुक्ताई शासकीय कृषी महाविद्यालय असे करण्याबाबत महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनास शिफारस केली आहे. तद्नुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी अनुदान वितरित करण्याबाबत

**(५) ९१७ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी रुपये पाच हजार देण्याचा निर्णय होऊनही सर्व शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम अद्याप अदा करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पेरा नोंदणी झालेली नाही त्यांनाही प्रती हेक्टरी रुपये पाच हजार अनुदान देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१६-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी पात्र शेतकऱ्यांना रुपये २८०८.७५ कोटी इतके अनुदान थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून आधार संलग्न बँक खात्यावर वितरीत करण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

खरीप, २०२३ मध्ये ज्या कापूस/सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी ई-पीक पोर्टलवर नोंद केलेली नाही. तथापि, खरीप २०२३ च्या ७/१२ उताऱ्यावर कापूस / सोयाबीन पिकाची नोंद आहे असे शेतकरी, वनपट्टे धारक शेतकरी व जिवती तालुक्यातील Non-digitalized गावातील पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. अशा शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे पात्र शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वन्य प्रण्याद्वारे होणारे पीक नुकसानीचा पंतप्रधान पीक विमा योजनेत समावेश करणेबाबत

**(६) ९२४ (०९-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वन्य प्राण्याद्वारे होणारे पीक नुकसानीचा पंतप्रधान पीक विमा योजनेत समावेश करणेबाबत विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी तत्कालीन मा.कृषी मंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्याद्वारे होणारे पीक नुकसानीचा पंतप्रधान पीक विमा योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१) होय.
(२) सुधारित पीक विमा योजना ही, सन २०२५-२६ साठी, पीक कापणी प्रयोगा आधारे आलेल्या उत्पन्नावर आधारीत राबविली जाणार आहे. वन्य प्राण्याद्वारे होणारे पीक नुकसान ही वैकल्पिक जोखीम बाब असल्याने या बाबीचा समावेश सुधारित पीक विमा योजनेंतर्गत करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील तहसिल कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून उत्पन्न दाखल्यांचे काम ठप्प असल्याबाबत

**(७) १०३२ (०९-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील तहसिल कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून उत्पन्नाचे दाखले दिले जात नसल्यामुळे दाखल्याविना नागरिकांची कामे प्रलंबित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी अहवालानुसार उत्पन्न दाखला देण्यात येत असल्याने सदर अहवालात खोटी माहिती आढळल्यास संबंधित तलाठ्यांवर कारवाई करण्यात येत असल्याने सदर कारवाईच्या भीतीमुळे तलाठ्यांनी उत्पन्न दाखल्यांसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीचे काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना तहसिल कार्यालयातून उत्पन्नाचे दाखले लवकरात लवकर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-१०-२०२५) :** (१), (२) व (३) हे अशंतः खरे आहे.

महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, जिल्हा (शाखा) ठाणे यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तहसिलदार कार्यालयास ग्राम महसूल अधिकारी यांचेकडील उत्पन्न अहवाल दिनांक २१/०१/२०२५ पासून बंद करीत असलेबाबत निवेदन प्राप्त झाले.

जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाच्या दिनांक ०५/०२/२०२५ च्या पत्रान्वये महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १/२०१२/प्र.क्र.१८/ ई-१, दिनांक ३१ मार्च २०१२ नुसार कार्यवाही करणेबाबत कळविल्यानुसार तलाठी संघामार्फत दिनांक १७/०२/२०२५ रोजीच्या निवेदनान्वये तलाठी अहवाल देण्याबाबतचे कामकाज सुरु करण्यात आले असल्याचे कळविले आहे. त्यानुषंगाने उत्पन्न दाखले बाबत हमीपत्र, फॉर्म १६, आधारकार्ड, रेशनकार्ड इ. कागदपत्रांची पडताळणी करुन अर्जदार यांना १ जानेवारी, २०२५ ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीत एकूण २६३७४ प्राप्त अर्जांपैकी २५५७० अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेलवंडी कोठार (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथील जिल्हा परिषद पाझर तलावातील भराव काढल्याबाबत

**(८) ११४२ (१४-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलवंडी कोठार (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथील जिल्हा परिषद पाझर तलावातील भराव अनधिकृतपणे काढून काँक्रीटची भिंत बांधून जनावरांसाठी गोठा बांधल्यामुळे तसेच या पाझर तलावापासून २५ मीटर अंतरावर ओढ्याच्या बरोबर मध्यभागी विहीर खोदल्यामुळे पाझर तलावाच्या मागून जाणारा

शेतकऱ्यांचा वहिवाट रस्ता बंद होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यास अडचण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार केली असून पाझर तलावाच्या जागेवर केलेले अतिक्रमण काढून टाकून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याबाबतचे निवेदन बीडीओ, तहसिलदार, पोलीस निरीक्षक श्रीगोंदा यांना शेतकऱ्यांनी व स्थानिक नागरिकांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या निवेदनाच्या अनुषंगाने अतिक्रमण काढून टाकण्यासाठी तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) पाझर तलावाच्या भरावाच्या खालील बाजुस गोठा बांधकाम व विहीर खोदलेली असल्याने व स्थानिक शेतकरी यांनी सदर क्षेत्र हे पाझर तलावासाठी संपादीत करण्यात आलेले नाही असे चौकशीमध्ये सांगितले आहे. पाझर तलावाच्या संपादित क्षेत्राची मोजणी झालेनंतर संपादित क्षेत्रामध्ये विहीर खोदकाम व गोठा बांधकाम केलेले आहे किंवा नाही याची खातरजमा करता येईल. सदर तलावाच्या मोजणीसाठी ग्रामपंचायत, बेलवंडी कार्यालयाने दिनांक २९/५/२०२५ रोजी ऑनलाईन अर्ज उपअधीक्षक, भूमी अभिलेख, श्रीगोंदा यांचे कार्यालयास सादर केला. मात्र मोजणी फी भरलेली नाही. आवश्यक मोजणी फी भरल्यानंतर मोजणी करण्याबाबत उप अधीक्षक भूमी अभिलेख श्रीगोंदा कार्यालयाने दक्षता घेतली आहे. तसेच सदर पाझर तलाव देखभाल दुरूस्तीसाठी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दिनांक ७ मे, २००३ अन्वये ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. त्यामुळे याकामी संबंधित ग्रामपंचायतीस सदर अतिक्रमण काढणेबाबत व गुन्हा दाखल करणेबाबत उप विभागीय जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग, श्रीगोंदा यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानाची भरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याबाबत

**(९) १२३० (०९-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे सन २०२३-२४ या हंगामामध्ये झालेले नुकसान भरून काढण्यासाठी पीक विमा कंपनीकडून भरपाई मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालयात आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनावर तसेच पीक विम्याची रक्कम मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१०-०९-२०२५) :** (१) होय.
(२) आंबिया बहार सन २०२३-२४ मध्ये द्राक्ष फळपिकासाठी सांगली जिल्ह्यातील एकूण १८९६ शेतकऱ्यांनी ८७४ हेक्टर क्षेत्रासाठी विमा सहभाग घेतला होता. सदर सर्व १८९६ शेतकऱ्यांना रुपये १८,२३,७१,३११/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उपजिल्हाधिकारी संवर्गाची पदसंख्या कमी करण्यात आल्याबाबत

**(१०) १४२७ (१४-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या महसूल विभागांतर्गत सन १९८२ पासून उपजिल्हाधिकारी संवर्गाची पदसंख्या ही सुमारे ७४४ असताना दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी वित्त विभागाची मान्यता न घेता सदरहू संवर्गाची पदसंख्या पूर्वलक्षी प्रभावाने कमी करुन ५१४ इतकी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्वलक्षी प्रभावाने सदर संवर्ग संख्या कमी केल्यामुळे गेल्या २३ वर्षापासून उपजिल्हाधिकारी पदावर काम करणाऱ्या पदोन्नत उपजिल्हाधिकारी यांच्या सेवाज्येष्ठतेवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपजिल्हाधिकारी संवर्गाची मूळ पदसंख्या पुनर्स्थापित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व वित्त विभागाची पूर्व परवानगी न घेता सदरहू पदसंख्या बेकायदेशीररित्या पुर्वलक्षी प्रभावाने कमी करण्यास जबाबदार असलेल्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२२-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २२/११/२०१३ अन्वये उप जिल्हाधिकारी संवर्गाची संवर्गसंख्या ६०० इतकी करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ‘ब’ सत्ताप्रकार मिळकती नियमित करण्याबाबत

**(११) १७२० (१४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ‘ब’ सत्ताप्रकार मिळकती नियमित करण्याची लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजे लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक येथे नगर भुमापन काम १९७० मध्ये झालेले आहे. त्याप्रमाणे १७८ मिळकतींना "ब" सत्ता प्रकार नमुद केलेला आहे. सदरचे "ब" सत्ता प्रकारच्या १७८ मिळकती ह्या वाढीव गावठाण मधील आहेत. त्यापैकी ४२ अर्जदार यांनी सत्ताप्रकार बदलाबाबत अर्ज सादर केलेले असून सदरचे अर्ज उप अधीक्षक भूमि अभिलेख निफाड यांचेकडे चौकशी अहवाल व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांपैकी ६ प्रस्ताव जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांचेकडून प्राप्त झाले आहेत. त्यासंदर्भात नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरीत ३६ प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक अधिनस्त उप अधीक्षक भूमि अभिलेख, निफाड यांचेस्तरावरुन अर्जदारांना कळविण्यात आले असता, मागणी केलेली कागदपत्रे संबंधीतांनी अद्यापपावेतो सादर केलेली नाही.

सदर विषयासंदर्भात मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार उपविभागीय अधिकारी निफाड, तहसिलदार निफाड व उप अधीक्षक भूमि अभिलेख निफाड यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून दिनांक २४/०४/२०२५, दिनांक ०५/०५/२०२५ व दिनांक २३/०५/२०२५ रोजीच्या बैठकांना हजर राहून कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत अध्यक्ष, "ब" सत्ता प्रकार संघर्ष समिती यांना कळविले असता, ते सदर वेळी हजर राहीले नसल्याने पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.

---

## राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याबाबत

**(१२) १८५० (१४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करावी अशा सूचना महाराष्ट्र शासनास दिल्या आहेत तसेच कृषी यांत्रिकीकरण, कृषी प्रक्रिया व शेतमालाच्या मूल्यवर्धनासाठी आवश्यक तंत्रज्ञानाचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून देण्यासाठी जिल्हास्तरावर कृषी अभियांत्रिकी अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यासंदर्भातही सूचना करण्यात आल्या अहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कृषी औद्योगिकीकरण वाढीसाठी कृषी आयुक्तालय, पुणे अंतर्गत कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय कृषी मंत्री महोदयांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाच्या स्थापनेसंदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतीचे पुनरुज्जीवन करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी राज्यात कृषी अभियांत्रिकी संचालनालयाची स्थापना करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) कृषी विभागाचा आकृतिबंध सूधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सुधारीत आकृतीबंधामध्ये कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापण करण्याचे प्रस्तावित आहे.

कृषी विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम होईपर्यंत कृषी आयुक्तालयातील उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सेवा तात्पूरत्या स्वरुपात घेवून कृषी अभियांत्रिकी संचालनायलाचे कामकाज सुरु करण्याबाबत आयुक्त(कृषी) यांना दिनांक २०/०६/२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच, दिनांक १०/०७/२०२५ च्या आदेशान्वये, श्री.अंकूश माने यांना संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय), कृषी आयुक्तालय, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंतप्रधान खरीप पीकविमा योजनेत "ई-पीक" पाहणी बंधनकारक करण्याची महत्वपूर्ण शिफारस केली असल्याबाबत

**(१३) १९४६ (१४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत होत असलेले गैरप्रकार टाळण्यासाठी "ई-पीक" पाहणी बंधनकारक करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस राज्य शासनाच्या समितीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंदाच्या खरीप हंगामात केवळ ६० टक्के तर रब्बी हंगामात १५ टक्के क्षेत्रावरील पिकांची नोंद ई-पीक पाहणी झाली असून पीक पाहणीचे बंधन केल्यास राज्यातील पेरणीचे प्रत्यक्ष प्रमाण समजू शकेल तसेच शासनाला पुढील कृषी धोरण ठरविणे सहज शक्य होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी "ई-पाहणी" बंधनकारक करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील, अधिसूचित पीकांसाठी, उत्पादनावर आधारीत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरीप हंगाम, २०२५ व रब्बी हंगाम, २०२५-२६ करीता राबविण्यास राज्य शासनाने दिनांक २४ जून, २०२५ च्या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिली आहे. याअंतर्गत पीक विमा नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणी करीता पीकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यभरात कार्यरत असलेल्या कृषी पर्यवेक्षकांच्या पदोन्नतीबाबत

**(१४) २४६६ (१०-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी अधिकारी गट ब (कनिष्ठ) या पदावर पदोन्नती देण्यासाठी दरवर्षी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करून पदोन्नती देण्याची पध्दत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी माहे सप्टेंबर महिन्यामध्ये सदर बैठक घेणे प्रशासनास बंधनकारक असूनही सन २०२४ मध्ये सदर बैठक न घेता राज्यातील सुमारे २०० पेक्षा अधिक कृषी पर्यवेक्षक कृषी अधिकारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कृषी अधिकारी गट ब (कनिष्ठ) या पदावर पदोन्नतीसंबंधात सन २०२४ मध्ये विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विभागीय पदोन्नती बैठक लवकरात लवकर आयोजित करून पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२८-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषी अधिकारी गट-ब (कनिष्ठ) या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने, परिपूर्ण माहिती प्राप्त झाल्यावर विभागीय पदोन्नती समितीसमोर प्रस्ताव विचारात घेण्यात आला. दिनांक २८/०३/२०२५ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली. त्यानुसार आयुक्त (कृषी) यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह सामान्य प्रशासन विभागास पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## नागपूरात वर्ल्ड बँकेच्या अर्थसहाय्याने स्मार्ट कॉटन प्रकल्प उभारण्याबाबत

**(१५) २६१० (१०-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भ, मराठवाडा, खानदेश या प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यात वर्ल्ड बँकेच्या सुमारे रुपये ३२० कोटींच्या अर्थसहाय्याने शासनाने बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत महाराष्ट्रातील कापसाचा स्वतःचा ब्रँड विकसित करणे, आधुनिक उत्पादन तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांचा मूल्यसाखळीत थेट सहभाग यांसारखी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात सदर अर्थसहाय्याद्वारे स्मार्ट कॉटन प्रकल्प न उभारता अधिकचा निधी जिनिंग तंत्रज्ञान अद्यावत करण्यासोबतच प्रकल्पाच्या प्रचार प्रसारावर खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कापसाच्या धाग्याच्या पिवळसर रंगामुळे चीनने कापूस खरेदी करण्यास नकार दिला असल्याची तसेच शासनाच्या नियोजनातील त्रुटींमुळे व धाग्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक गुलाबी बोंड अळी प्रतिबंधक बोलगार्ड-३ (VIP३A) बियाणे उपलब्ध होऊ न शकल्यामुळे प्रकल्प अपयशी ठरल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात चौकशी करून यामध्ये दोषी असलेल्या संबंधीतावर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली तसेच कापसाच्या धाग्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी व सदर स्मार्ट कॉटन प्रकल्प सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२६-०९-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यात १२ जिल्ह्यांमध्ये रुपये ९६.२२ कोटी खर्चाच्या "स्मार्ट कॉटन" उपप्रकल्पाची अंमलबजावणी सन २०२१ पासून सुरू करण्यात आली होती. कापूस मूल्यसाखळीचा सर्वसमावेशक विकास करणे तसेच उत्पादन, प्रक्रिया, ब्रँडिंग आणि विक्रीमध्ये शेतकऱ्यांचा थेट सहभाग वाढवून मूल्यवर्धन करणे हा या उपप्रकल्पाचा मुख्य उद्देश होता.
(२) हे खरे नाही.

स्मार्ट कॉटन उपप्रकल्पाच्या उद्दिष्टानुसार कृषी विस्तार विषयक कापूस मूल्य साखळी विकास शाळा अंतर्गत पीक प्रात्यक्षिके, शेतकरी प्रशिक्षण, अभ्यास दौरे, बाजार संमेलन व शेतीशाळा या घटकांची क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी करण्यात आली होती. यासाठी उपलब्ध रुपये २८.९८ कोटीच्या तरतूदीतून रुपये १८.४९ कोटी जून-२०२५ अखेर साध्य झाले आहे. सदर निधीचा वापर मंजूर कृती आराखड्यानुसारच करण्यात आलेला आहे. जिनिंग तंत्रज्ञान अद्यावत करणे हा प्रकल्पाच्या आराखड्याचा भाग नव्हता.
(३) व (४) हे खरे नाही.

सन २०२१ ते २४ या कालावधीत प्रकल्पातील उपक्रमांचा सहभागी शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. तथापि, प्रकल्पातील घटकांच्या अनुदानासाठीचा खर्च व अंमलबजावणी यंत्रणावरील आस्थापना खर्चाच्या प्रमाणात कापूस गाठी रूपांतरण अत्यल्प म्हणजेच एकूण सहभागी शेतकरी संख्येच्या तुलनेत कापूस गाठी प्रक्रियेत शेतकरी सहभागाची टक्केवारी १ ते १.५ % व वार्षिक लक्षांक १ लाख गाठीचे असताना चार वर्षाच्या कालावधीत प्रागतिक कापूस गाठी निर्मिती केवळ ९४५४ इतक्याच होऊ शकल्या. उद्दिष्टांच्या तुलनेत प्रकल्प लाभांकित होत नसल्यामुळे उदिष्टपुर्ती अभावी पुढे न राबविण्याचा निर्णय झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पवनार नदीच्या लगत सेवाग्रामविकास आराखड्यांतर्गत (जि.वर्धा) ईको पार्कचे काम निधी प्राप्त असूनही अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६) २६२० (१७-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इको पार्क हे पर्यावरणाचे संरक्षण आणि जनजागृती करण्यासाठी असलेले उद्यान असून पवनार नदीच्या लगत सेवाग्रामविकास आराखड्यांतर्गत (जि.वर्धा) सन २०१९ मध्ये रुपये २.५० कोटी एवढा निधी प्राप्त होवूनही ईको पार्कचे अद्याप अजूनही पूर्ण झाले नसल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यांनांमध्ये विविध प्रकारच्या वनस्पती, प्रवेशद्वार, गहू लावणे, सिमेंट कॉकीटचे कामे, ठिंबक सिंचन, झाडे लावणे व इतर देखभाल दुरूस्तीची कामे इ. बाबी सदर प्रकल्पांतर्गत प्रस्तावित असून उक्त प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-११-२०२५) :** (१) होय.

(२) प्रकल्पातील अपूर्ण कामाची नव्याने निविदा प्रकिया राबविण्यात येत असून लवकरच ही कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील घरकुल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) ३४६७ (१०-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील घरकुल लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची तसेच नदी, खाडीपात्रातील वाळू, रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाइन विक्री पध्दतीऐवजी लिलाव पध्दतीने करण्यात येणार असल्याचे धोरण निश्चित करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या वाळू गटांतील किमान १० टक्के वाळू विविध घरकुल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या वाळू गटांतील किमान १० टक्के वाळू विविध घरकुल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयाने वाळू रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून त्यामध्ये पात्र लिलावधारक यांनी, त्यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १० टक्के वाळू घरकूल लाभार्थ्यांना (५ ब्रास पर्यंत) विनामूल्य उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार सदर धोरणाच्या अमंलबजावणीची कार्यवाही जिल्हास्तरावर करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भटके विमुक्त समाजाच्या विविध मागण्या संदर्भात

**(१८) ४१३२ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भटके व विमुक्त समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भात मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत भटके व विमुक्त समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, रेशनकार्ड तसेच इतर विविध अधिकृत दाखले मिळवून देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समाजातील व्यक्तींना राज्यातील कुठल्याही रेशन दुकानातून धान्य मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासह सुमारे १५ मागण्यांबाबत निर्णय घेण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील भटके व विमुक्त समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०२५) :** (१) होय, भटके विमुक्तांसाठी सर्वकष कागदपत्र अभियान व इतर महत्वाच्या विषयाबाबत दिनांक १५/०५/२०२५ रोजी मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.
(२) व (३) सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दिनांक ३/०६/२०२५ अन्वये इतिवृत्त निर्गमित करण्यात आले असून संबंधित विभागांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील मे. लॉयडस मेटल स्टील प्लांट, घुग्गुस या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१९) ४१३८ (१०-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मे. लॉयडस मेटल ॲण्ड स्टील प्लांट, घुग्गुस या कंपनीमार्फत नवीन कारखाना सुरू करण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्यावर त्यांना शांतीनगर येथे स्थलांतरित करून तेथे पुनर्वसनाच्या स्वरूपात जमिनी वाटप करण्यात आल्याची तसेच सदर जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्यात येतील असे कंपनीने आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीला सुमारे ३० वर्षे लोटूनही जमिनी संबंधित शेतकऱ्यांच्या नावे करण्यात आल्या नसून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आह काय,
(३) असल्यास, शांतीनगर येथे वितरित करण्यात आलेल्या जमिनी स्थलांतरित शेतकऱ्यांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, तसेच संबंधित कंपनीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, सदर विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२६-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

मौजा घुग्घुस येथील सर्वे क्र.१६७ अधिग्रहीत भूखंड नसून सदर जागा लॉयड्स मेटल यांनी स्वत: खरेदी हक्काने घेतली आहे. तद्‌नंतर सदर जागेवर अकृषक निवासी प्रयोजनाकरीता रूपांतरीत करून ६२ भूखंड निर्माण केले आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

लॉयड मेटल यांनी मूळ जमिनीचा ताबा असणाऱ्या एकूण ५२ व्यक्तींना भूखंड वाटप केले आहेत. तथापि, सदर भूखंड त्यांचे नावे हस्तांतरीत झाल्याचे दिसून येत नाही.
(३) प्रस्तूत बाब लॉयड्स मेटल कंपनी लि. यांचे स्तरावरील असल्याने स्थलांतरीत शेतकऱ्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी व्यवस्थापक, लॉयड्स मेटल कंपनी लि., ता.जि.चंद्रपूर यांना नायब तहसिलदार यांच्या दिनांक २८/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय आणि प्रशासकीय सेवेत काम करु इच्छित असणाऱ्या तरुणांसाठी मुख्यमंत्री पाठ्यवृत्ती योजना जाहीर झाल्याबाबत

**(२०) ४६५१ (१२-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय आणि प्रशासकीय सेवेत काम करण्याची इच्छा असणाऱ्या तरुणांना एक वर्षाचा कार्यानुभव देणारी मुख्यमंत्री पाठ्यवृत्ती नुकतीच योजना नुकतीच जाहीर झाली मात्र या पाठ्यवृत्तीच्या वयोमर्यादेवर तरुणांनी नाराजी व्यक्त केल्याने ही वयोमर्यादा २१ ते २६ ऐवजी ३० ते ३५ वर्षे करण्याची मागणी करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रि ल,२०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरुणांना प्रशासकीय सेवेचा थेट अनुभव मिळावा यासाठी मुख्यमंत्री पाठयवृत्ती योजनेची वयोमर्यादा २१ ते २६ वर्ष ऐवजी ३० ते ३५ वर्षे करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (११-११-२०२५) :** (१) होय.
(२) नियोजन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०३/०४/२०२५ अन्वये मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम २०२५-२६ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार फेलोंची किमान वयोमर्यादा २१ व कमाल २६ अशी निश्चित करण्यात आली आहे. त्याबाबतचा निर्णय हा शासन स्तरावर घेण्यात आला असल्याने व सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी अर्थ व सांख्यिकी संचालनालय स्तरावर सुरु होऊन निवड प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने सदर शासन निर्णयात कोणताही बदल करण्याचे प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.